लातूर समाचार
LATUR SAMACHAR

# सायबर सुरक्षेचे धडे - विद्या प्राथमिक विद्यामंदिर येथे सायबर वॉरियर्सचे सत्र

**लातूर/प्रतिनिधी** : राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ऊलशी ड्हळझीहर षी ऊलशी डीरझीहर या उपक्रमांतर्गत विद्या प्राथमिक विद्यामंदिर, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी आणि अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग मेसेजची ओळख, पासवर्डची सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे मार्ग तसेच सायबर गुन्हे नोंदविण्याची प्रक्रिया व हेल्पलाईन १९३० याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शुभांगी चौधरी, सहसचिव श्री. विजय यादव, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण झाली असून ते आता इंटरनेटचा वापर अधिक सजगतेने आणि सुरक्षिततेने करतील, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला.